महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
# राज्य मराठी विकास संस्था
**एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,**
**धोबीतलाव, मुंबई - ४००००१**
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्र. एफ. १६०९४(मुंबई)
सत्यमेव जयते
**संकेतस्थळ :** https://rmvs.marathi.gov.in **इ-टपाल :** rmvsmumbai@gmail.com; rmvs_mumbai@yahoo.com

जा.क्र. आस्था /प्र.क्र.५२/३३८/२०२२ दिनांक : ०७ /०४ /२०२२

**ई-निविदा सुचना क्र. १/२०२२-२३**

**( मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थांकडून ई निविदा मागविण्याबाबत )**

राज्य मराठी विकास संस्था, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई - ४०० ००१ या कार्यालयात काही पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यासाठी मनुष्यबळ पुरविणाऱ्या नोंदणीकृत व अनुभवी यंत्रणांकडून ई निविदा मागविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने तपशीलवार जाहिरात, ई निविदा भरण्यासाठी अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**निविदेचे वेळापत्रक**

| माहिती | तपशील |
|---|---|
| ई-निविदा प्रसिद्ध | दिनांक ०७ एप्रिल, २०२२ |
| ई-निविदा सादर करण्याचा कालावधी | दिनांक ०७ एप्रिल ते १९ एप्रिल, २०२२ दुपारी ०३.०० पर्यंत |
| ई-निविदा पूर्व बैठक (संस्थेच्या कार्यालयात) | दिनांक १३ एप्रिल, २०२२ सकाळी ११.०० वाजता. |
| तांत्रिक लिफाफा उघडण्याचा दिनांक, वेळ | दिनांक २२ एप्रिल, २०२२ सकाळी ११.०० वाजता |
| वित्तिय लिफाफा उघडण्याचा दिनांक व वेळ | संकेतस्थळावर कळविण्यात येईल. |

**टीप – उपरोक्त दिनांक व वेळेमध्ये बदल होऊ शकतो. सर्व बदलाचा तपशील संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर संकेतस्थळावर नमूद केलेल्या सर्व तारखा व वेळ अंतिम असेल. तरी निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी. निविदा इच्छुकांसाठी सविस्तर माहिती संस्थेच्या https://rmvs.marathi.gov.in या संकेतस्थळावर अवलोकनासाठी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.**

सही/-
संचालक,
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई.

## आवश्यक मनुष्यबळाचा तपशील

राज्य मराठी विकास संस्था, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१. या कार्यालयात, पुस्तकाचं गाव, भिलार तसेच अन्य प्रकल्पांसाठी समन्वयक ०१, डेटा एंट्री ऑपरेटर ०१, मदतनीस -०१, प्रकल्प सहायक ०४, संगणक सहायक ०२, वाचनदूत ०८, अशी एकूण १७ पदे भरावयाची आहेत. भरावयाच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **क्र.** | **पदाचे नाव** | **एकूण पदे** |
|---|---|---|
| १ | समन्वयक | ०१ |
| २ | डेटा एंट्री ऑपरेटर | ०१ |
| ३ | मदतनीस | ०१ |
| ४ | प्रकल्प सहायक | ०४ |
| ५ | संगणक सहायक | ०२ |
| ६ | **वाचनदूत** | **०८** |
| | **एकूण पदे** | **१७** |

**आवश्यक मनुष्यबळाचा तपशील व पात्रता**

बाह्ययंत्रणेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या खालील पदांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात येत आहे.

**१. समन्वयक - १ पद**

- उमेदवाराने मराठी वाङ्मय व भाषा किंवा मराठी भाषेशी संबंधित भाषाविज्ञान या विषयातील किमान द्वितीय श्रेणी मिळवून पदवी धारण केलेली असावी अथवा कोणत्याही शाखेचा मराठीवर प्रभुत्व असलेला पदवीधर असावा.
- उमेदवारास भाषाविषयक विविध प्रकल्पांसाठी मराठी भाषा व साहित्य, भाषाविज्ञान, मराठी भाषेची सद्यस्थिती व समस्या यांचे ज्ञान असावे.
- उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान असावे.
- उमेदवारास संगणकावर स्वतंत्रपणे काम करण्याची क्षमता असावी. युनिकोड वापराचे ज्ञान असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
- उमेदवाराची वयोमर्यादा १८ ते ३८ वर्षे असावी. मागासवर्गीय उमेदवारासाठी वयोमर्यादा ५ वर्षे शिथिल असेल.

**२. डेटा एंट्री ऑपरेटर - ०१ पद**

- उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण केलेली असावी.
- उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान असावे.
- उमेदवारास संगणकावर स्वतंत्रपणे काम करण्याची क्षमता असावी. युनिकोड वापराचे ज्ञान असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
- उमेदवाराची वयोमर्यादा १८ ते ३८ वर्षे असावी. मागासवर्गीय उमेदवारासाठी वयोमर्यादा ५ वर्षे शिथिल असेल.

**३. मदतनीस - ०१ पद**

- उमेदवार उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण असावा.
- उमेदवार मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान असावे.
- उमेदवार MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असावा. संगणकावर मराठी वापरण्याचे ज्ञान असावे. युनिकोड वापराचे ज्ञान असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
- उमेदवाराची वयोमर्यादा १८ ते ३८ वर्षे असावी. मागासवर्गीय उमेदवारासाठी वयोमर्यादा ५ वर्षे शिथिल असेल.

**४. प्रकल्प सहायक - ०४ पदे**

- उमेदवाराने मराठी विषयातील पदवी धारण केलेली आहे अथवा कोणत्याही शाखेचा मराठीवर प्रभुत्व असलेला पदवीधर असावा.
- उमेदवारास मराठी भाषा व साहित्य, भाषाविज्ञान, मराठी भाषेची सद्यस्थिती व समस्या यांचे ज्ञान असावे.
- उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान असावे. युनिकोड वापराचे ज्ञान असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
- उमेदवाराने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून विहित केलेले “संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र” धारण केलेले असावे.

- उमेदवाराची वयोमर्यादा १८ ते ३८ वर्षे असावी. मागासवर्गीय उमेदवारासाठी वयोमर्यादा ५ वर्षे शिथिल असेल.

**५. संगणक सहायक - ०२ पदे**

- उमेदवाराने बी.ई. ( आयटी / कॉम्प्युटर सायन्स ) / बी.एससी. ( आयटी / कॉम्प्युटर सायन्स ) / बीसीए / बीसीएस यापैकी पदवी धारण केलेली असावी.
- वेब डेव्हलपमेंट मधील किमान १ वर्षाचा अनुभव असावा. (php, mysql, js, css)
- मुक्त आज्ञावलीबाबत माहिती असावी व मराठीचे ज्ञान असावे / संगणकावर मराठी वापरता येण्याची माहिती असावी. युनिकोड वापराचे ज्ञान असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
- उमेदवाराची वयोमर्यादा १८ ते ३८ वर्षे असावी. मागासवर्गीय उमेदवारासाठी वयोमर्यादा ५ वर्षे शिथिल असेल.

**६. वाचनदूत - ०८ पदे**

- उमेदवार उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण असावा.
- उमेदवार मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान असावे.
- उमेदवार शारीरिकदृष्ट्या सक्षम असावा.
- उमेदवाराची वयोमर्यादा १८ ते ३८ वर्षे असावी. मागासवर्गीय उमेदवारासाठी वयोमर्यादा ५ वर्षे शिथिल असेल.
- उमेदवारास सकाळी व सायंकाळी दोन्ही वेळेस पंचवटी एक्सप्रेस व डेक्कन क्वीन यामध्ये काम करण्यासाठी प्रवास करावा लागेल.

**बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थांसाठी अटी व शर्ती**

| | |
|---|---|
| १. | संबंधित संस्था ही खालीलपैकी किमान एका कायद्यांतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. (नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.)<br>• मुंबई दुकाने व आस्थापना विभाग.<br>• भागीदारी संस्था अधिनियम.<br>• सहकारी संस्था अधिनियम.<br>• कंपनी अधिनियम.<br>• महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम, १९६० |
| २. | कंत्राटाची एकूण रक्कम अंदाजे मासिक रुपये ३,५५,०००/- (रुपये तीन लक्ष पंचावन्न हजार) |
| ३. | ई-निविदा अर्जासोबत निविदा शुल्क रुपये ३०००/- बयाना ठेव रक्कम रु. ५०,०००/- ऑनलाईंन स्वरुपात भरणे आवश्यक आहे. |
| ४. | कंत्राटदाराने मनुष्यबळ पुरविल्यानंतर त्या बाबतचा पारिश्रमिक/मोबदला हा मासिक तत्वावर (monthly basis) कंत्राटदाराने दोन प्रतीत सादर केल्यानंतर, ६० दिवसांच्या आत देण्यात येईल. तसेच पारिश्रमिक/मोबदला देण्यास कोणत्याही कारणास्तव उशीर झाला तर त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही. |
| ५. | दरमहा अदा होणा-या देयकामधून नियमानुसार आयकर, GST संबधित व अन्य आवश्यक कर कपात करण्यात येतील. कर कपाती नियमानुसार संबंधित कार्यालयात जमा न केल्यास यशस्वी निविदाकार हा फौजदारी कार्यवाहीसाठी पात्र राहील. |
| ६. | संस्थेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या उमेदवारांचे मासिक पारिश्रमिक अनिवार्य वजाती (EPFO अंतर्गत वर्गणी व इतर) करून त्यांच्या बँक खात्यामध्ये अदा केल्याचा पुरावा प्रमाणपत्रासह (Bank Statement etc.) संचालक, राज्य मराठी विकास संस्था या कार्यालयास दरमहा दिनांक २५ पूर्वी सादर करावा लागेल. तद्नंतरच संस्थेचे पुढील महिन्याचे देयक पारीत करण्यात येईल. |
| ७. | उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २२.०२.२०१९ च्या शासन परिपत्रकात नमूद तरतुदीनुसार शासनाने निर्धारित केलेल्या वेतनदराप्रमाणे वेतन तसेच वेळोवेळी लागू असलेले कर व अनुज्ञेय भत्ते अदा करणे संस्थेस बंधनकारक राहील. उपलब्ध करून दिलेल्या मनुष्यबळाला देय असलेल्या कायदेशीर आर्थिक वेतनात अंतर्भूत दायित्व उदा. इ.पी.एफ.ओ., इ.एस.आय.एस. कामगार वेल्फेअर फंड इत्यादी बाबी वेतनातून कपात करून संबंधित प्राधिकरणांकडे जमा करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. |
| ८. | मागील २ वर्षाच्या कालावधीत किमान २ शासकीय / निमशासकीय कार्यालयांना कंत्राटी तत्वावर, मनुष्यबळ पुरविल्याबाबतचा व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र अपलोड करणे आवश्यक आहे. |
| ९. | यशस्वी निविदाकाराला रा.म.वि.सं.कडे रुपये २,००,०००/- इतकी सुरक्षा अनामत ठेव म्हणून राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गॅरेंटी सादर करावी लागेल. संबधित कंत्राटी कर्मचा-यांच्या मानधनाची हमी म्हणून सदर |

| | |
|---|---|
| | रक्कम जमा करणे आवश्यक आहे. त्यात कोणतीही सूट देण्यात येणार नाही. तसेच कंत्राटदाराद्वारे बाह्यस्त्रोत कर्मचा-यांच्या मानधनातून विहित वजावटी व्यतिरिक्त अन्य कपात केल्याचे आढळून आल्यास सुरक्षा ठेवीतून सदर रक्कम वजा केली जाईल. याशिवाय त्यांचे कंत्राटही रद्द केले जाईल. |
| १०. | बाह्ययंत्रणेद्वारे पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळांसंदर्भात करण्यात आलेल्या कराराचा कालावधी ११ महिन्यांचा राहील. कराराची मुदत संपल्यानंतर शासनाने मान्यता दिल्यास कराराची मुदत वाढविण्यात येईल. संबंधित पुरवठादाराशी करण्यात आलेला करार चालू ठेवण्याचे / संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांचूया स्वाधीन असतील. पुरवठादारास सदर करार संपुष्टात आणावयाचा असल्यास संस्थेस तीन महिन्यांची नोटीस देणे आवश्यक राहील. तसेच संस्थेस मुदत पूर्ण होण्याआधी करार संपुष्टात आणावयाचा असल्यास पुरवठादारास तशी पूर्वसूचना कोणतेही कारण न देता एक महिना अगोदर देऊन करार संपुष्टात आणला जाईल. पुरवठादाराकडून करारातील अटी व शर्तींचे पालन समाधानकारकरित्या न झाल्यास करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा/कराराची मुदतवाढ करणे/मुदत कमी करणे याबाबतचा अंतिम निर्णय संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांचा असेल. जर सदर करारास मुदतवाढ दिल्यास उमेदवाराचे मासिक मानधन जुन्या करारातील दरानेच देण्यात येतील. कोणत्याही कर्मचा-यास संस्थेने मंजूर केलेल्या रजांव्यतिरिक्त अन्य शासकीय रजा लागू होणार नाहीत. तसेच कर्मचारी १५ दिवसांपेक्षा जास्त दिवस गैरहजर राहिल्यास संबधित कर्मचा-याची सेवा कमी करून दुसऱ्या कर्मचाऱ्याची सेवा पुरवावी लागेल. |
| ११. | पुरवठादाराची मागील २ वर्षाची वार्षिक उलाढाल रुपये १.०० कोटी पेक्षा कमी नसावी. तसेच सनदी लेखापालांकडून प्रमाणित करण्यात आलेल्या मागील २ वर्षांच्या ताळेबंदांच्या (Audited Balance Sheet) प्रती अपलोड करण्यात याव्यात. पुरवठादाराच्या मागील २ वर्षाच्या आयकर विवरणपत्रांच्या (Income Tax Returns) प्रती अपलोड करण्यात याव्यात. |
| १२. | पुरवठादाराकडून देण्यात आलेल्या उमेदवारास त्यांचे मासिक मानधन अदा करण्याची जबाबदारी सर्वस्वी पुरवठादाराची राहील. तसेच उमेदवार कार्यालयात अनुपस्थित राहिल्यास देयकातील रकमेतून त्या कालावधीची रक्कम वजा करण्यात येईल. |
| १३. | पुरवठादारामार्फत पुरविण्यात येणारा उमेदवार गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नसावा. उमेदवारांची सचोटी / चारित्र्याबाबतचा पोलिसांचा दाखला पुरवठादाराने योग्य कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. तसेच कार्यालयीन कामकाजात उमेदवारांकडून कसूर/आर्थिक गैरव्यवहार झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील आणि झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली पुरवठादाराकडून करण्यात येईल. उमेदवार वैद्यकीयदृष्ट्या कामकाज करण्यास सक्षम असावेत. |
| १४. | **कायमस्वरूपी नोकरीसाठी उमेदवार संस्थेकडे व शासनाकडे मागणी करणार नाही किंवा त्यासाठी न्यायालयाकडे दावा अथवा खटला भरणार नाही, अशा आशयाचे उमेदवाराचे व पुरवठादाराचे हमीपत्र सेवेत हजर होताना पुरवठादाराने संस्थेस देणे आवश्यक राहील.** |
| १५. | **बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध होणाऱ्या उमेदवारांची सेवा पूर्णपणे कंत्राटी व तात्पुरत्या स्वरूपाची असून त्यांना भविष्यात या पदावर नियुक्तीचा अधिकार प्राप्त होणार नाही. तसेच त्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व** |

| | |
|---|---|
| | **शासनावर/संस्थेवर असणार नाही.** |
| १६. | रोजगार व स्वयंरोजगार विभाग, शासन निर्णय क्र. रोस्वरो 2002/प्र.क्र.267/रोस्वरो-1, दिनांक 17.08.2002 मधील अ क्र 8 अन्वये शासकीय कार्यालयांमध्ये किंवा निमशासकीय आणि स्वायत्त संस्थांच्या कार्यालयांमध्ये सेवेचा पुरवठा करण्याकरिता निविदा भरताना अनामत रक्कम भरण्याच्या अटीतून नोंदणीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना/लोकसेवा केंद्रांना सूट देण्यात आली आहे. |
| १७. | प्राप्त झालेल्या निविदांपैकी कोणतीही एक निविदा स्वीकारण्याचा अथवा कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा संपूर्ण अधिकार, संचालक, राज्य मराठी विकास संस्था हे स्वतःजवळ राखून ठेवीत आहेत. |
| १८. | निविदेसंबंधीचा पत्रव्यवहार संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांच्याशी करण्यात यावा. |
| १९. | कराराच्या अनुषंगाने यशस्वी निविदाकार व राज्य मराठी विकास संस्था यांच्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास ते मुंबई स्थित न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहील व त्याबाबतची त्याची सर्वस्वी जबाबदारी व खर्च संबंधित पुरवठादाराची राहील. |
| २०. | राज्य मराठी विकास संस्थेकडून यशस्वी निविदाकारास मनुष्यबळ पुरविण्याचे आदेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत पदांसाठी विहित केलेल्या अर्हतेनुसार उमेदवार उपलब्ध करून देणे पुरवठादारास बंधनकारक आहे. तसेच मागणीनुसार पुरवठादाराने उमेदवार उपलब्ध न करून दिल्यास त्यांच्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येवून प्रति दिन, प्रति उमेदवार रु.२००/- चा दंड पुरवठादाराकडून घेण्यात येईल. |
| २१. | पुरवठादाराद्वारे पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळाचे कामकाज समाधानकारक नाही, असे निदर्शनास आल्यास त्याऐवजी अन्य उमेदवार तात्काळ उपलब्ध करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. 15 दिवसांचे आत उमेदवार उपलब्ध न करून दिल्यास पुरवठादारावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येवून प्रति दिन, प्रति उमेदवार रु.२००/- चा दंड पुरवठादाराकडून घेण्यात येईल. |
| २२. | पुरवठादाराद्वारे प्राप्त उमेदवारास कोणत्याही स्वरूपाची गंभीर इजा/ दुखापत झाल्यास उपचाराच्या खर्चाचे कोणतेही दायित्व राज्य मराठी विकास संस्थेचे / शासनाचे असणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची राहील. |
| २३. | शासकीय कामकाजाचे अनुषंगाने आवश्यक गोपनियतेचा भंग होणार नाही याची जबाबदारी प्राप्त उमेदवार तसेच पुरवठादाराची असेल. अशा गोपनीयतेचा भंग झाल्यास पुरवठादार तसेच उमेदवारावर कायदेशीर कारवाई करण्याचे हक्क राज्य मराठी विकास संस्थेस असतील. |
| २४. | राज्य मराठी विकास संस्थेद्वारे निर्धारित केलेल्या कामकाजाच्या वेळेनुसार कामाचा कालावधी राहील. संबंधित उमेदवाराने त्याची कार्यालयात येण्याची व कार्यालय सोडण्याची वेळ याबाबत राज्य मराठी विकास संस्थेच्या नोंदणीशाखेत ठेवण्यात येणाऱ्या नोंदवहीत नोंद करणे आवश्यक राहील. आवश्यकता असल्यास जादा वेळ कार्यालयात थांबावे लागेल. तसेच वेळप्रसंगी कामाची निकड विचारात घेऊन |

| | |
|---|---|
| | सुट्टीच्या दिवशी कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक राहील. |
| २५. | संस्थेच्या कार्यालयीन मालमत्तेची काळजी / देखभाल संबंधित उमेदवाराने करणे आवश्यक राहील. तसेच मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित पुरवठादाराची असेल. |
| २६. | कंत्राटी कर्मचाऱ्याने कर्तव्यावर असताना नशापान/धुम्रपान व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करता नये. |
| २७. | बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करण्यासाठी निवड होणा-या निविदाकारास रा.म.वि.संस्थेशी करार करावा लागेल. पुरवठादारास सर्व अटी व शर्ती मान्य असल्यास त्यांच्या सेवा पुरविण्यासंबंधिचा करार रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करणे आवश्यक राहील. |
| २८. | बाह्ययंत्रणेद्वारे प्राप्त होणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचे भत्ते लागू असणार नाही. तसेच जाण्या-येण्याचा खर्चही पुरविण्यात येणार नाही.  तथापि संस्थेच्या आदेशानुसार कार्यालयीन कामाकरीता केलेल्या प्रवासासंबंधी संस्थेच्या मंजुरीने अनुज्ञेय असणारा प्रवास खर्च व भत्ता देण्यात येईल. |
| २९. | ई-निविदा भरताना संस्थेने जाहिरातीत दर्शविण्यात आलेल्या पदांसाठीच्या एकत्रित वेतनावरील एकूण रकमेच्या सेवाकराचा दर नमूद करणे आवश्यक राहील. निविदा भरताना पुरवठादारांनी नमूद केलेला दर सर्व  पदांसाठी  लागू राहील. |
| ३०. | सदर ई-निविदा पूर्णपणे एकाच निविदाकारास अथवा विभागून एकापेक्षा जास्त निविदाकारास देण्याचे अधिकार संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांचे स्वाधीन राहतील. |
| ३१. | एकदा निविदा भरल्यावर निविदाकाराला निविदेच्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे समजण्यात येईल. |
| **३२.** | **निविदा रकमेच्या किमान एक टक्का सेवा शुल्क असावा. मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराने निविदेत नमूद करण्यात आलेल्या दरापेक्षा कमी दराने अन्य कोणत्याही शासकीय कार्यालयांमध्ये मनुष्यबळ उपलब्ध करून देत नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक असेल.  तथापि ज्या पुरवठादाराशी करार करण्यात येईल त्या पुरवठादाराने राज्य मराठी विकास संस्थेस दिलेल्या दरापेक्षा कमी दराने अन्य शासकीय कार्यालयास मनुष्यबळ उपलब्ध करून दिल्याचे आढळून आल्यास पुरवठादारास कमी दराने मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे लागेल व त्या नुसार संस्थेकडून करण्यात आलेल्या जादा अतिरिक्त रकमेचे प्रदान राज्य मराठी विकास संस्थेस परत करावे लागेल.** |
| **३३.** | **मनुष्यबळ पुरवठादार संस्थेने अन्य सेवापुरवठादार संस्थेशी उपकरार करता येणार नाही.** |
| ३४. | निविदेची वैधता निविदा उघडल्याच्या दिनांकापासून ६ महिने राहील. |
| ३५. | निवड झालेल्या पुरवठादाराने करार करण्यास नकार दिल्यास पुरवठादाराने भरलेली अनामत रक्कम जप्त केली जाईल. |
| **३६.** | **निविदा प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी, सुरु असताना किंवा त्यानंतरच्या कालावधीत त्यात काही बदल करणे/ निविदेच्या अटी व शर्ती /तांत्रिक बाबींमध्ये बदल करावयाचे झाल्यास त्याबाबतची माहिती शुध्दीपत्रकाद्वारे प्रसिध्द करण्यात येईल. त्याचे अधिकार पूर्णतः संचालक, राज्य मराठी विकास संस्था,** |

| | |
|---|---|
| | **मुंबई यांना असतील.** |
| ३७. | **या करारामध्ये पुरवठादारातर्फे काम करणाऱ्या कर्मचारी यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व संस्थेवर किंवा शासनावर राहणार नाही.** |
| ३८. | निविदाकारांनी निविदा भरण्यासाठी त्यांच्या अधिनस्त असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यास सदर निविदेचे कागदपत्र साक्षांकित करण्याची परवानगी दिली असल्यास त्या संदर्भात पुरवठादाराने तशा आशयाचे प्राधिकृत पत्र (authority letter) अपलोड करावे. |
| ३९. | निविदेतील नमूद आवश्यक मनुष्यबळ कमी-जास्त करण्याचे अधिकार संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई  यांना असतील. |
| ४०. | **निविदेत नमूद पदांच्या वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता तसेच इतर अटी शिथिल करण्याचा अधिकार संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई  यांना राहील.** |
| ४१. | नमूद अटी व शर्तींमध्ये काही अटींचा समावेश करण्यात आला नसल्यास महाराष्ट्र शासनाने निविदेसाठी वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी लागू राहतील. |
| ४२. | स्थळ :- राज्य मराठी विकास संस्था, एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१. |

## संबंधित संस्थानी दरपत्रके सादर करावयाचे विहीत नमुने

### फॉर्म - अ : तांत्रिक बाबीसाठी लिफाफा क्र. १

| अ.क्र. | | संस्थेचा तपशील |
| --- | --- | --- |
| १. | संस्थेचे नांव | |
| २. | नोंदणीचा प्रकार/क्रमांक<br>a. मुंबई दुकाने व आस्थापना विभाग<br>b. भागीदारी संस्था अधिनियम.<br>c. सहकारी संस्था अधिनियम.<br>d. कंपनी अधिनियम.<br>e. महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधि.1950 व संस्था नोंदणी अधि.1860 | |
| ३. | शासन निर्णय दिनांक 17.08.2002 मधील तरतुदीनुसार संस्था बेरोजगार सहकारी सेवा संस्था/लोकसेवा केंद्र याअंतर्गत नोंदणीकृत आहे काय? | |
| ४. | कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| ५. | मागील २ वर्षाच्या कालावधीत शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ उपलब्ध करून दिल्याचा तपशील. (कार्यालयांची नावे/दुरध्वनी/पत्ते) | |
| ६. | उपलब्ध करून दिलेल्या उमेदवारांचे मासिक मानधन प्रत्येक महिन्यात ECS/NEFT द्वारे बँकेत जमा करण्यास व तसा पुरावा राज्य मराठी विकास संस्थेस सादर करण्याची निविदाकाराची तयारी आहे काय ? | |
| ७. | मागील तीन वर्षाचे सनदी लेखापाल यांनी लेखा परीक्षण केलेले व प्रमाणित केलेले ताळेबंद (Audited Balance Sheet) | |
| ८. | मूळ निविदा अर्ज (सर्व पृष्ठांवर स्वाक्षरीसह) | |

**निविदा तांत्रिक लिफाफा- यामध्ये पुढील बाबींचा समावेश खालील नमुन्यात असावा व तो अपलोड करण्यात यावा.**

a) पॅन कार्डची छायांकित प्रत अपलोड करण्यात यावी.
b) सेवा कर/जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत अपलोड करण्यात यावी.
c) उमेदवारांना ECS/NEFT द्वारे मानधन अदा करण्याची पुरवठादाराची तयारी असल्याचे प्रमाणपत्र पुरवठादाराच्या सही शिक्क्यासह अपलोड करण्यात यावे.
d) मागील २ वर्षात किमान २ शासकीय / निमशासकीय कार्यालयांना बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरविल्याबाबत व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र अपलोड करण्यात यावे.
e) मागील ३ वर्षांचे सनदी लेखापाल यांनी लेखा परीक्षण केलेले व प्रमाणित केलेले ताळेबंद (Audited Balance Sheet) अपलोड करण्यात यावेत.
f) रोजगार व स्वयंरोजगार विभाग, शासन निर्णय क्र. रोस्वरो 2002/प्रक्र 267/रोस्वरो - 1, दिनांक 17.08.2002 मधील अ क्र. 8 अन्वये शासकीय कार्यालयांमध्ये किंवा निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्ये सेवेचा पुरवठा करण्याकरिता निविदा भरताना अनामत रक्कम भरण्याच्या अटीतून पंजीकृत बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना/लोकसेवा केंद्राना सूट देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्र अपलोड करण्यात यावे.

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांनी बाह्ययंत्रणेद्वारे पदे भरण्यासाठी मागविलेल्या दरपत्रकातील अटी व शर्ती या संस्थेस मान्य असून, वरील जोडपत्र-अ मधील माहिती सत्य आहे. (तांत्रिक लिफाफा क्र.१ ची साक्षांकित प्रत अपलोड करण्यात यावी.)

**स्थळ :** **संस्था चालकाची स्वाक्षरी :--------------**

**स्वाक्षरीताचे नाव --------------------**

**दिनांक :** **कार्यालयाचा शिक्का ------------------**